महार चिकना येथील रिमेंट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे? >> पान 2

राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे; जागतिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी >> पान 3

लोकप्रतिनिधींनी सर्वोच्च सभागृहाचे पावित्र्य सांभाळावे-शेतकरी नेते रविकांत तूपकर >> पान 4



# दैनिक आपला विदर्भ


**सुविचार**
चांगल्या विचारांची साथ द्या.


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 03 ■ मंगळवार, दि. 22 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



सौंदर्यच ठरलं श्राप! सुंदर दिसते म्हणून फेम अभिनेत्रीला मालिकेतून हाकलंल, म्हणाली त्या लोकांनी मला...

आतील पान

# २००६च्या मुंबई बॉम्बस्फोटातल्या सर्व १२ आरोपींची निर्दोष सुटका

## मुंबई बॉम्बस्फोटप्रकरणी हायकोर्टाचा धक्कादायक निकाल; महाराष्ट्र एटीएसचा मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील लोकल ट्रेनच्या फर्स्टक्लास डब्यांमध्ये ११ जुलै २००६ रोजी झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाचा धक्कादायक निकाल आज उच्च न्यायालयाने दिलाय. या स्फोटात २८४ जणांचा मृत्यू आणि ८०० पेक्षा अधिक जखमी झालेले होते. या प्रकरणात तपास यंत्रणांनी अटक केलेल्या ४ आरोपींना सत्र न्यायालयाने फाशीची तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निकाल फिरवत सगळ्या आरोपींची निर्दोष मुक्तता केलीय. त्यापैकी बशीर खान आणि मुजम्मिल शेख हे दोन आरोपी सध्या येरवडा कारागृहात आहेत. उच्च न्यायालयाच्या या निकालाने अनेकांना धक्का बसला असून आता एटीएसने याबाबत आपली भूमिका मांडली आहे.**

हायकोर्टाच्या निकालानंतर बॉम्ब स्फोटातील आरोपींच्या सुटकेची प्रक्रिया सुरू झाली असून आदेश मिळताच पुण्यातील कारागृहात असलेल्या दोघांची सुटका केली जाईल. एकीकडे या निकालावर अनेकांनी आश्र्चर्य व्यक्त केलं असून ज्येष्ठ विधिज्ञ आणि खासदार उज्ज्वल निकम यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. आता, याप्रकरणी मुंबई एटीएसने सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे म्हटले आहे.

मुंबईतील २००६ च्या पश्र्चिम रेल्वे साखळी बॉम्ब स्फोट खटल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर पहिल्यांदाच एटीएस म्हणजेच महाराष्ट्र राज्य, दहशतवाद विरोधी पथकाने भूमिका मांडली आहे. ३० सप्टेंबर २०१५ रोजी मा. मोक्का विशेष न्यायालय, मुंबई यांनी निकाल दिला होता. त्यामध्ये ५ आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा, तर ७ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली होती. याप्रकरणी एका आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. मात्र, याप्रकरणी मृत्युदंडाच्या संदर्भाने आणि दोषी आरोपींचे अपिल उच्च न्यायालयातील न्या. किलोर आणि चांडक यांचे खंडपीठासमोर सुनावणीकरीता होते. नमुद खटल्यात ए.एस.जी. राजा ठाकरे आणि स्पेशल पी.पी. चिमलकर यांनी राज्य सरकारची बाजू मांडली. प्रस्तुत सुनावणी जुलै २०२४ पासून खंडपीठासमोर सुरू होती. त्यामध्ये अभियोग व बचाव पक्षाचे युक्तीवाद २७ जानेवारी २०२५ रोजी पूर्ण झाले होते. त्यामुळे, याप्रकरणी खटल्यामध्ये उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आज रोजी निकाल दिला, त्यामध्ये मृत्युदंडाचे संदर्भ नाकारण्यात आले आणि दोषी आरोपींचे अपिल देखील मान्य करण्यात आले.तसेच, मोक्का विशेष न्यायालयाचा निकालही रद्द करण्यात आला आहे.



### एटीएस सुप्रीम कोर्टात जाणार

दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून सदर खटल्याचे विशेष अभियोक्ता यांच्याशी सल्लामसलत करून व निकालाच्या विश्र्लेषणाअंती पुढील निर्णय घेण्यात येत आहे, असे एटीएसने म्हटले आहे. एटीएस मुंबई हायकोर्टाच्या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात जाणार आहे. सुप्रीम कोर्टात जाण्यासाठी हायकोर्टाच्या निकालाचे अवलोकन करून अभ्यास करण्यात येईल. सरकारी वकिलांशी चर्चा करूनच सुप्रीम कोर्टात जाण्याची तयारी एटीएसकडून करण्यात येणार आहे.

### मुंबई बॉम्ब स्फोट प्रकरणातील चार आरोपींची सुटका

**अमरावती/प्रतिनिधी :** मुंबई बॉम्ब स्फोट प्रकरणातील १२ पैकी ४ आरोपी हे अमरावती मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होते.अमरावती मध्यवर्ती कारागृहातून ४ कैद्यांची सुटका करण्यात आली आहे.

सन २०१५ पासून अमरावती मध्यवर्ती कारागृहात सर्व चार जन या ठिकाणी शिक्षा भोगत होते. दहा वर्ष अमरावती कारागृहात हे चार लोक होते.तब्बल १९ वर्षानंतर मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींची सुटका झाली आहे. तनवीर अहमद मोहम्मद इब्राहिम अन्सारी, महद मजीद महद शफी, सुहिल मोहम्मद शेख, जमीर अहमद लतीफुर रहेमान शेख हे चार कैदी अमरावती मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होते. त्यांची अमरावती मध्यवर्ती करागृहातून सुटका करण्यात आली आहे.सर्व चारही जण आपले सामान घेऊन कारागृहा बाहेर आले. नातेवाईक त्यांना घ्यायला आले होते. सदर प्रकारा बाबत मात्र, अमरावती मध्यवर्ती कारागृह प्रशासनाकडून कमालीची गुप्तता पाळण्यात आली आहे. तर न्यायालयाच्या निकालावर प्रतिक्रिया देताना आरोपी सोहेल शेख यांनी आम्ही २० वर्षानंतर आज आम्ही जेल मधून सुटलो. देवावर आणि न्यायालयावर आमचा विश्वास आहे असे मत व्यक्त केले.या प्रकरणाशी आमचा काही संबंध नव्हता. माझा सिमी सोबत संबंध आहे.असा माझ्यावर आरोप होता. सरकारकडे आमची कोणतीच मागणी नाही. असे मत व्यक्त केले.

## वकिलांना समन्स बजावणे म्हणजे कायद्याचे उल्लंघन, सर्वोच्च न्यायालयने ईडीला पुन्हा झापलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** जेष्ठ वकील अरविंद दातार आणि प्रताप वेणुगोपाल यांना ईडीने पाठवलेल्या समन्सवर सर्वोच्च न्यायालयाने नापसंती दर्शवली आहे. वकील आणि त्यांचा अशील यांच्यातील संवाद हा खासगी आणि गोपनीय असतो, तसेच तो विशेषाधिकार आहे. त्यावर अशा प्रकारे वकिलांना समन्स बजावणे योग्य आहे का? असा सवाल सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने उपस्थित केला.

सरन्यायाधीश गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने याप्रकरणात एसयूएन एमओटीयू याचिका दाखल करुन घेतली आहे. वकिलांमध्ये आणि त्यांच्या अशीलामधील संवाद हा गुप्त राखणे त्यांचा विषेशाधिकार असताना ईडीने संबंधित वकिलांना नोटिस कशी पाठवली असा प्रश्र्न न्यायालयाने विचारला. अशा प्रकारे नोटिस देणे म्हणजे कायद्याचे उल्लंघन असल्याचंही न्यायालयाने म्हटलंय. भारताचे ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांनी देखील कोर्टात सांगितले की, ईडीने जे केले ते चुकीचे होते.

ईडीने रिलिगेअर एन्टरप्रायझेसच्या माजी अध्यक्षा रश्मी सलुजा यांना २५० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या ईएसओपी देण्याच्या प्रकरणात तपासादरम्यान हे समन्स बजावले होते. अरविंद दातार यांनी या एडजझी बाबत कायदेशीर मत दिले होते आणि प्रताप वेणुगोपाल हे ॲडव्होकेट-ऑन-रिकॉर्ड होते. देशभरातील बार असोसिएशन्सकडून मोठ्या प्रमाणात टीका झाल्यानंतर ईडीने नोटिस मागे घेतली. तसेच सर्व फील्ड अधिकाऱ्यांना अशा प्रकारच्या वकिलांना नोटिस देण्यास मनाई करणारे परिपत्रक जारी केले. आता कोणत्याही विशेष परिस्थितीत नोटिस द्यायची असल्यास एऊ डायरेक्टरची मंजुरी आवश्यक ठरवण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयने यावेळी इतर दोन प्रकरणांमध्येही ईडीने बजावलेल्या भूमिकेवर नापसंती व्यक्त केली. यामध्ये बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विरोधातील प्रकरण आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धारमय्या यांच्या पत्नीच्या विरोधातील प्रकरणाचा समावेश आहे.

राजकीय लढाया या न्यायालयाबाहेरल लढा. राजकारणासाठी ईडीचा वापर का केला जात आहे असा प्रश्र्न सर्वोच्च न्यायालयने केला. ईडीचा वापर कशा प्रकारे केला जातो हे महाराष्ट्रामध्ये दिसून आलं अशी टिप्पणीही सर्वोच्च न्यायालने केली आहे.

## शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती तरीही एवढा निर्लज्जपणा कृषिमंत्री करताय : खा. अमर काळे

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** राज्यात शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट आहे. मागील सहा महिन्यात राज्यात ५४३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलीय तर मराठवाड्यात एकाच दिवशी चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलीय. अशी परिस्थिती असतांनाही राज्याचे कृषिमंत्री हे सभागृहात रमी गेम खेळताय यामुळे निर्लज्ज कृषीमंत्रीचा मुख्यमंत्री यांनी तात्काळ राजीनामा घ्यावा अशी मागणी वर्ध्याचे शरद पवार गटाचे खासदार अमर काळे यांनी केलीय. ते वर्ध्याच्या आर्वीत पत्रकारांशी संवाद साधतं होते.

माणिकराव कोकाटे यांचा सभागृहामध्ये रमी खेळताना चा व्हिडिओ पाहण्यात आला. या गोष्टीचा अतिशय वाईट वाटते की ज्या व्यक्तीकडे राज्याच्या कृषी खात्यासारखी जबाबदारी आहे आणि शेतकऱ्यांचे एवढे प्रश्न महाराष्ट्रात प्रलंबित असताना या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात होत असताना राज्याचे कृषिमंत्री सभागृहात रमी खेळत आहे. यावरून या खात्याच्या संदर्भामध्ये जे मंत्र्याच गांभीर्य



पाहिजे ते गांभीर्य किती आहे हे कळून चुकलंय. यामुळे अपेक्षा आहे की एवढ्या बेजबाबदारपणे कृती करणाऱ्या कृषी मंत्राचा तात्काळ राजीनामा या राज्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला पाहिजे.आज जर पाहिलं तर मागील सहा महिन्यात ५४३ शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात आत्महत्या केल्या आहे. मराठवाड्यात एकाच दिवशी चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलीय. एवढी बिकट परिस्थिती शेतकऱ्यांची महाराष्ट्रात आहे अशी परिस्थिती असताना एवढं निर्लज्जपणा जर कृषिमंत्र्याकडून होत असेल तर त्याची दखल घेऊन राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी तात्काळ कृषिमंत्र्यांचा राजीनामा घेतला पाहिजे. अशा पद्धतीची कृती महाराष्ट्रात चालणार नाही हा संदेश या निमित्ताने त्यांनी दिला पाहिजे असंही खासदार अमर काळे म्हणाले.


### एअर इंडियाचे विमान मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवर घसरले, सर्व प्रवासी सुरक्षित

**मुंबई/प्रतिनिधी :** अहमदाबादमधील एअर इंडियाच्या अपघाताच्या आठवणी अजूनही ताज्या असताना आज एअर इंडियाचा अपघात थोडक्यात टळला आहे. कोचीहून मुंबईला जाणारे एअर इंडियाचे विमान - AI 2744 A320 हे मुसळधार पावसात आज मुंबई विमानतळावर उतरताना धावपट्टीवरून घसरले. सुदैवानं सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित असल्याची माहिती छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाकडून (सीएसएमआयए) सांगण्यात आली. विमान धावपट्टीवरून घसरल्यानंतर धावपट्टीच्या कच्च्या जागेवर वळले. परंतु ते पुन्हा धावपट्टीच्या पक्क्या पृष्ठभागावर आले. धावपट्टीला किरकोळ नुकसान झाल्याची नोंद आहे. विमान जमिनीवर उतरण्याची प्रक्रिया सुरू ठेवण्यासाठी दुय्यम धावपट्टी (१४३२) सक्रिय करण्यात आली आहे. विमान सुरक्षितपणे गेटवर पोहोचले असून विमानातील सर्व प्रवासी आणि क्रू मेंबर्स उतरले आहेत. विमान तपासणीसाठी ग्राउंड करण्यात आलं आहे. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे, असे एअर इंडियानं म्हटलं आहे.

## काही झालं तरी खडसेंना फक्त गिरीश महाजन दिसतो : गिरीश महाजन

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** प्रफ ुल लोढा हा एक सर्वपक्षीय कार्यकर्ता आहे आहे, गेल्या विधानसभेतलाच त्यांनी आंबेडकरांच्या पक्षाकडून लोकसभेचेही तिकीट घेतलं होतं, प्रफुल लोढा यांनी सर्व पक्षांमध्ये प्रवेश केलेला आहे सर्व पक्षांच्या नेत्यांबरोबर त्याचे फोटोही आहेत, माझ्याबरोबर त्यांचा फोटो आहे म्हणून तसं काही नाही फोटो आहे म्हणून सुतावरून स्वर्ग गाठता येत नाही, खडसेंचे स्टेटमेंट आणि लोढाचं स्टेटमेंट पाहिलं तर



आश्र्चर्य वाटेल, खडसेन बद्दल काय बोलावं ते मला समजत नाही, सगळीकडे अपयश आहे, सत्तेपासून दूर लटले गेले आहेत भाजपमध्ये लोटांगण घातलं तरी त्यांना कोणी जवळ केलं नाही, एकतर आजारपण एक तर अपयश यामुळे हा माणूस द्वेष भावेने पछाडलेला आहे, काही झालं तरी खडसेंना गिरीश महाजन दिसतो, हा लोढा निखिल खडसे यांनी आत्महत्या केली त्यानंतर तो काय काय बरळला, लोढाने तर मागणी केली होती की खडसेंच्या मुलाची आत्महत्या आहे की मर्डर आहे याची एस आय टी नेमणूक चौकशी करावी, खडसेने बोलताना थोडंसं तारतम्य ठेवलं पाहिजे, खडसेने रिकामे उद्योग करू नयेत अशी प्रतिक्रिया मंत्री गिरीश महाजन यांनी जामनेर येथील भाजपमध्ये गेलेले प्रफुल लोढा हे हनी ट्रॅप प्रकरणा मध्ये अटक झाल्यानंतर यांनी दिली आहे.

## शिवसेनेचे अमरावती जिल्हा पक्ष निरीक्षक म्हणून संजय रायमुलकर यांची नियुक्ती

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेनेचे मेहकर मतदार संघाचे माजी आमदार संजय रायमुलकर यांची पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अमरावती जिल्हा पक्ष निरीक्षक म्हणून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी नियुक्ती केली आहे.

संजय रायमुलकर १९८७ पासून शिवसेनेत विविध पदांवर कार्यरत होते.२००१ पर्यंत तालुका प्रमुख ,नंतर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि २००९ ते २०२४ पर्यंत तीन वेळा आमदार होते.२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा निसटता पराभव झाला असला तरी त्यांनी सद्याही जनसेवेत अहोरात्र स्वतःला झोकून दिलेले नेते म्हणून ओळखले जातात.

आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यावर अमरावती जिल्हा पक्ष निरीक्षक म्हणून जबाबदारी टाकली आहे.त्यांच्या निवडीबद्दल केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी त्यांचा शिवसेना कार्यालयात सत्कार केला.



# महार चिकना येथील सिमेंट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे?

## उपसरपंच वसंता ढाकणे यांची गटविकास अधिकारी लोणार यांचेकडे तक्रार

दैनिक आपला विदर्भ

**महार चिकना/प्रतिनिधी :** लोणार तालुक्यातील महार चिकना येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते कोनाटी रोड पर्यंत झालेले सिमेंट रस्त्याचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असुन संबंधित कामामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण झाली असल्यामुळे या रस्त्यावर मुरूम कमी प्रमाणात टाकला, जाडी गिट्टी सुद्धा वापरली नाही सिमेंट रेती सुद्धा कमी प्रमाणात वापरली, सिमेंट रस्त्यामध्ये लोखंड सुद्धा वापरलेला नाही संबंधित रस्त्यामध्ये खूप मोठ्या


संग्रहीत छायाचित्र

प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून संबंधित कामाची तात्काळ चौकशी करण्यात यावी जर सदर कामाची चौकशी झाली नाही आणि इंजिनियर, ठेकेदार यांच्यावर कारवाई झाली नाही तर दिनांक २८ जुलै २०२५ पासून वसंत भगवान ढाकणे उपसरपंच महार चिकना हे गटविकास अधिकारी कार्यालय लोणार यांच्या कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याची तक्रार त्यांनी गटविकास अधिकारी लोणार यांचे कडे केले आहे सदर तक्रारीची एक प्रत जयकुमार गोरे ग्रामविकास मंत्री महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त अमरावती, मुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा, सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज कायंदे मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांना एक प्रत दिली असुन संबंधित कामाची तात्काळ चौकशी करण्यात यावी अशी मागणी वसंत ढाकणे यांनी केली आहे.

> सदर सिमेंट रस्त्याचे काम हे शासनाच्या इस्टिमेट नुसार उत्कृष्ट झाले असून कुठल्याही प्रकारचा भ्रष्टाचार नसून काम हे चांगल्या प्रकारे झाल्यामुळे गावकर्यांमध्ये खूप समाधान दिसत आहे
> **-सरपंच शिवाजीराव ढाकणे**
> **महारचिकना**

## महान पार्श्वगायक मुकेश

आज २२ जुलै, हिंदी चित्रपट सृष्टीतील महान पार्श्वगायक मुकेश यांची आज जयंती. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. जयंतीदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

## सौंदर्यच ठरलं श्राप! सुंदर दिसते म्हणून फेम अभिनेत्रीला मालिकेतून हाकललं, म्हणाली त्या लोकांनी मला...

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी टेलिव्हिजनवर आपल्या अभिनयाने वेगळी छाप उमटवणारी अभिनेत्री जान्हवी किल्लेकर सध्या एका धक्कादायक अनुभवामुळे चर्चेत आली आहे. बिग बॉस मराठी मधून घराघरात पोहोचलेली आणि भाग्य दिले तू मला मालिकेतील खलनायिकेच्या भूमिकेने गाजलेली जान्हवी, सध्या कलर्स मराठीवरील आई तुळजाभवानी मालिकेत दिसतेय.

मराठी टेलिव्हिजनवर आपल्या अभिनयाने वेगळी छाप उमटवणारी अभिनेत्री जान्हवी किल्लेकर सध्या एका धक्कादायक अनुभवामुळे चर्चेत आली आहे. बिग बॉस मराठी मधून घराघरात पोहोचलेली आणि भाग्य दिले तू मला मालिकेतील खलनायिकेच्या भूमिकेने गाजलेली जान्हवी, सध्या कलर्स मराठीवरील आई तुळजाभवानी मालिकेत दिसतेय.

पण नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने असा खुलासा केला आहे, जो ऐकून कुणालाही धक्का बसेल. तिला चक्क जास्त सुंदर दिसते म्हणून एका मोठ्या प्रोजेक्टमधून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला होता! पण नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने असा खुलासा केला आहे, जो ऐकून कुणालाही धक्का बसेल. तिला चक्क जास्त सुंदर दिसते म्हणून एका मोठ्या प्रोजेक्टमधून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला होता!

जान्हवी किल्लेकरच्या मते, तिच्या सौंदर्याचीच तिला कधी कधी किंमत मोजावी लागते. तिने सांगितलं. जान्हवी किल्लेकरच्या मते, तिच्या सौंदर्याचीच तिला कधी कधी किंमत मोजावी लागते. तिने सांगितलं, ''एक नंबर नावाची एक मालिका येणार होती. त्यात मला अभिनेत्रीच्या बहिणीची भूमिका मिळणार होती. पण तिथे मला नाकारण्यात आलं, आणि कारण काय दिलं? ही हिरोईनपेक्षा जरा जास्तच सुंदर दिसते!... त्यामुळे ही नको असं म्हणून त्यांनी मला प्रोजेक्टमधून काढून टाकलं.''

जान्हवीला अजूनही कळत नाही की तिच्या डोळ्यांमुळेच ती सगळ्यांना खलनायिका का वाटते. ''आतापर्यंत मी केलेले सगळे रोल निगेटिव्हच आहेत, माहीत नाही का?'' असं ती म्हणते. पण सर्वात जास्त तिला वाईट वाटलं ते या गोष्टीचं की, ''मी चांगली दिसते म्हणून तुम्ही मला काढून टाकत आहात?'' ही गोष्ट तिच्या मनाला खूप लागली.

जान्हवीने पुढे तिच्या संघर्षाची कहाणी सांगितली. जान्हवीने पुढे तिच्या संघर्षाची कहाणी सांगितली. ''त्या लोकांनी मला खूप नाचवलं. दररोज येणं, ऑडिशन देणं, लूक टेस्ट करणं... एवढं सगळं करून पण म्हणतात की, तुझं काहीच नाही होणार. मग तुम्ही ते मला आधीच सांगायला हवं होतं ना?'' अशी खंत तिने व्यक्त केली.

## सहकार पुरस्कारासाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ; सहकारी संस्थांनी अर्ज करण्याचे आवाहन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनामार्फत राज्यातील सहकार चळवळीच्या विकासात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सहकारी संस्थांना दरवर्षी सहकार पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येते. आर्थिक वर्ष २०२३-२४ या कालावधीतील कामगिरीच्या आधारे संस्थांची निवड करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते. सदर कालबद्ध कार्यक्रमात अंशतः बदल करण्यात आला असून ३१ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आले आहे. इच्छुक सहकारी संस्थांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह तालुका सहाय्यक निबंधक कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी केले आहे.

पुरस्काराबाबत सविस्तर माहिती व अर्ज नमुना http://sahakarayukta.maharashtra.gov.in या सहकार विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच जिल्हा उपनिबंधक व तालुका स्तरावरील सहाय्यक निबंधक कार्यालयात उपलब्ध आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणीकृत सर्व सहकारी संस्थांनी संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांनो, घरच्या बियाण्याचे संरक्षण करा; कृषि विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी घरच्या बियाण्याचा वापर करावे. बदलत्या हवामान परिस्थिती आणि बाजारातील बियाण्यांच्या वाढत्या किमती लक्षात घेता, स्वतःचे बियाणे जपून ठेवणे ही शाश्वत शेतीसाठी महत्त्वाची बाब ठरत आहे. सर्व शेतकऱ्यांनी पुढील हंगामासाठी घरच्या बियाण्याचे संरक्षण करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

**घरच्या बियाण्याचे फायदे :** बाजारातील महागड्या बियाण्यांचा खर्च टाळता येतो. स्थानिक हवामान व जमिनीस अनुरूप बियाण्यांची उगमशक्ती चांगली राहून गुणवत्तेबाबत सुनिश्चिता असते. इतरांवर अवलंबून न राहता स्वतःच्या बळावर शेती करता येते. स्थानिक, पारंपारिक व दुर्मिळ वाण टिकवता येतात. बियाणे साठवताना योग्या काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. बियाण्याची उगवण क्षमता व किडींपासून सुरक्षित राहण्यासाठी निरोगी व रोगमुक्त झाडांपासूनचे बियाणे निवडावे, बियाणे नीट स्वच्छ करून, त्यातील ओलावा पूर्णपणे काढून वाळवावेत. बियाणे हवाबंद डबे, पोती किंवा मातीची भांडी यामध्ये कोरड्या, थंड व अंधाऱ्या ठिकाणी ठेवावेत. किंड नियत्रंणासाठी कडुलिंबाचा पाला किंवा राख याचा वापर करून नैसर्गिक संरक्षण करावे. बियाण्यांवर वाणाचे नाव व साठवण्याची तारीख लिहावे.

प्रतिबंधात्मक उपाययोजनामुळे शेतकऱ्यांना पुढील हंगामासाठी चांगल्या प्रतीचे बियाणे उपलब्ध होऊन त्यांची आर्थिक बाजू मजबूत होण्यास मदत होईल.

## मृत इसमाची (रमेश सुरुशे) ओळख पटविण्याबाबत आवाहन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पोलिस स्टेशन बुलढाणा (शहर) अंतर्गत रमेश शामराव सुरूशे (वय ४५ वर्षे) यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना दि. १६ जुलै २०२५ रोजी बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयात भरती करण्यात



आले होते. या इसमाचे उपचारादरम्यान, दि. १८ जुलै रोजी निधन झाले. मृत्यूवेळी त्यांच्यासोबत कोणीही नातेवाईक उपस्थित नोव्हते. सदर इसमाचे कोणत्याही नातलग किंवा परिचित व्यक्तीचा शोध लागलेला नसल्याने ओळखीच्या व्यक्ती असलेल्या नागरिकांनी पुढे येऊन माहिती द्यावी, असे आवाहन तपासी अंमलदार यांनी केले आहे.

सदर मृतकांचा बांधा सडपातळ, उंची सुमारे ५.५ फूट, रंग निमगोरा, डोक्यावर अर्धवट टक्कल, काळी-पांढरी मिश्र दाढी राखलेली व वेशभूषा शासकीय रुग्णालयाचा निळ्या रंगाचा परिधान केलेला आहे. सदर इसमाविषयी काहीही माहिती आहे किंवा नातेवाईक म्हणून ओळखता येतील, त्यांनी तात्काळ पोलिस अधिकाऱ्यांशी किंवा हेड कॉन्स्टेबल नरेंद्र रीठे (८३०९९ ६२३२४), विश्वास हिवाळे (८३०८५ ७८७२४) या क्रमांकावर संपर्क साधावा.

# अवैध प्रवासी वाहतूक बंद करा

## महाराष्ट्र गरीबग्रेड संघटनेचे पोलीस निरीक्षकांना निवेदनाद्वारे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** परिसरात होणारी अवैध वाहतूक तात्काळ बंद करावी, अन्यपरिसरात होणारी अवैध वाहतूक तात्काळ बंद करावी,अशी मागणी महाराष्ट्र गरीबग्रेड संघटनेच्या वतीने संघटनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष गजानन मेटांगळे यांनी डोणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना २१ जुलै रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमुद केले आहे की,डोणगाव हे शहर जास्त लोकसंख्येचे आहे. आणि सदर शहराला लागून बरेच खेडेगाव जोडलेले आहेत. तसेच डोणगाव शहर बाजारपेठेचे ठिकाण आहे. शहरामधून पोलीस स्टेशन बस स्टॅन्ड जवळून जाणारा मोठा रोड असल्याकारणाने सदर रोडवर नियमित असंख्य जनतेची वर्दळ असते. तसेच बस स्टॅन्डवर बहुसंख्य विद्यार्थ्यांची संख्या असते. अशा मध्ये डोणगाव बस स्टॅन्डवरून मेहकर आणि मालेगाव ला जाणाऱ्या अवैद्य प्रवासी वाहतूक करणारे बरीच वाहन दिसून येतात. सदर अवैध प्रवासी करणारी वाहने क्षमतेपेक्षा जास्त




प्रवासी घेऊन नियमबाह्य सुसाट वेगाने धावतात आणि सदर वाहनातून प्रवाशांची वाजवीपेक्षा जास्त पैसे घेऊन प्रवाशांचा छळ होताना दिसून येत आहे.

सुसाट वेगाने धावणाऱ्या या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे जनतेला खूप त्रास सहन करावा लागत आहे आणि यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर अवैध प्रवासी वाहतूक तात्काळ बंद करण्यात यावी,अशी मागणी महाराष्ट्र गरीबग्रेड संघटनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष गजानन मेटांगळे यांनी डोणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## नवी मुंबई महापालिकेच्या ६६८ जागांसाठी ८४७७४ पैकी ६८१४९ उमेदवारांनी दिली परीक्षा !

**मुंबई/प्रतिनिधी :** 'नवी मुंबई महानगरपालिका सरळसेवा भरती - २०२५' साठी होणाऱ्या परीक्षेसाठी ८४७७४ उमेदवारांनी अर्ज केले होते. पालिकेने या परीक्षेसाठी १६ ते १९ जुलै दरम्यान महाराष्ट्रातील १२ जिल्हयांमधील २८ परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन परीक्षेचे आयोजन केले होते.त्यात दिली. १६ ते १९ जुलै या परीक्षेच्या ४ दिवसात ८४७७४ उमेदवारांपैकी ६८१४९ उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षा दिली. सर्व केंद्रांवरली परीक्षा प्रक्रिया व्यवस्थित रितीने पार पडली.

महापालिकेतील भरतीसाठी गट - क आणि गट - ड मधील ३० संवर्गातील ६६८ पदांकरिता टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिस यांच्या माध्यमातून परीक्षेचे नियोजन करण्यात आले होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### सकल मराठा समाजातर्फे रम्मी खेळत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा निषेध



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा समाज आणि शेतकरी हक्क व संरक्षण संघर्ष समितीतर्फे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा नको तर त्यांना जुगार आणि मटका कॅबिनेट मंत्री बनवावे अशी उपहासात्मक मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी रम्मी खेळत कृषी मंत्र्यांच्या कृतीचा निषेध व्यक्त केला असून छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्याला करण्यात आलेल्या मारहाणीचा देखील यावेळी निषेध नोंदविण्यात आलाय.

### मोठ्या माशाला वाचवण्यासाठी छोट्या माशाचा राजीनामा अजित पवारांकडून घेतला जातोय - रोहिणी खडसे



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** लातूर येथे काल झालेल्या प्रकरणामुळे सुरज चव्हाण यांचा राजीनामा जो अजित पवारांनी घेतला आहे, तो अतिशय स्वागतार्ह आहे, परंतु ज्या प्रकरणाची जिथून सुरुवात झाली आहे त्या माणिकराव कोकाट्यांचं काय? मोठ्या माशाला वाचवण्यासाठी छोट्या माशाचा राजीनामा अजित दादा कडून घेतला जातोय, ज्या माणिकराव कोकाटे ने महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचा अपमान केलेला आहे, त्या माणिकराव कोकाट्यांचा राजीनामा घेण्याचं मोठेपणा दाखवणार आहात का अजित पवार यांना असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी अजित पवार यांना केला आहे

### महादेव मुंडेंच्या खून प्रकरण तपासासाठी एसआयटी नियुक्त करा - जरांगे पाटील



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** महादेव मुंडे यांचा खून होऊन दिड वर्ष उलटले, तरी देखील तपास लागला नाही. मुख्यमंत्र्यांना गुंडच पोसायचे आहेत का? या प्रकरणात येत्या २५ तारखेपर्यंत नियुक्त करावी. अन्यथा बीडसह राज्यभरात आंदोलन करण्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी परळी येथे मुंडे कुटूंबीयांच्या निवासस्थानी भेट घेत संवाद साधला.

यावेळी मुंडे कुटूंबीयांना अश्रु अनावर झाले. माध्यमांशी संवाद साधताना जरांगे पाटील म्हणाले, एक बांधव सांगतोय की, मासाचा तुकडा नेऊन टेबलवर ठेवला, मुंडे कुटूंबीयांनीही आरोप केले आहेत. तरी देखील आरोपी अटक होत नाहीत. या प्रकरणात जे कोण पोलिस अधिकारी, कर्मचारी होते त्यांचे कॉल डिटेल्स देखील तपासायला हवेत, आता मी या प्रकरणात लक्ष दिले आहे. काय काय होते ते तुम्हाला दिसेल, असे जरांगे पाटील यांनी सांगत येत्या २५ तारखेपर्यंत नियुक्त न झाल्यास राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे; जागतिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी

## कृषी विभागाचा उपक्रम; अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** विविध देशांनी विकसित केलेले शेतीविषयक तंत्रज्ञान व तेथील शेतकऱ्यांनी त्याचा केलेला अवलंब व त्याद्वारे त्यांच्या उत्पन्नात झालेली वाढ जाणून शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरिता कृषी विभागाकडून अभ्यास दौरे आयोजिण्यात येत आहेत.

योजनेअंतर्गत निवड झालेल्या शेतकऱ्यांना युरोप (नेदरलँड्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, फ्रान्स), इस्राईल, जपान, मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाइन्स, चीन आणि दक्षिण कोरिया अशा प्रगत देशांमध्ये अभ्यास दौऱ्यावर पाठवण्यात येणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक शेतक-यांनी दि. २४ जुलैपूर्वी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे अर्ज करावेत, असे आवाहन कृषी उपसंचालक ए.बी. गावडे यांनी केले आहे.

**अभ्यास दौऱ्याचे उद्दिष्टे**

उत्पादन व उत्पादकता वाढविणे, शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर, काढणीपश्चात प्रक्रिया व व्यवस्थापन पद्धतींचा अभ्यास, जागतिक शेती व्यवस्थापन प्रणाली समजून घेणे, निर्यातक्षम शेतीचा विकास.

**देशनिहाय अभ्यासाचे क्षेत्र**

युरोप दौऱ्यामध्ये फलोत्पादन, सेंद्रिय शेती, दुग्धोत्पादनातील आधुनिक पद्धतीचा अभ्यास, इस्राईल दौऱ्यात पाणी व्यवस्थापन, कृषी यांत्रिकीकरण, जपान दौऱ्यात सेंद्रिय शेती व उच्चतंत्र शेती पद्धती, मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाइन्स दौऱ्यांत काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन, चीन दौऱ्यात कृषी , उत्पादनवाढ तंत्रज्ञान, दक्षिण कोरिया दौऱ्यात आधुनिक अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानाचा अभ्यास केला जाईल. या दौऱ्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये शेतातील नवोन्मेषाबाबत जागरूकता निर्माण होईल. आधुनिक बाजार व्यवस्थापन, निर्यातीच्या संधी आणि जागतिक



स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी शेतकऱ्यांचे ज्ञान वाढणार आहे.

**पात्रतेचे निकष**

अर्जदार स्वतः शेतकरी असावा, अर्जदाराच्या नावावर मागील ६ महिन्यांचा ७/१२ आणि ८-अ उतारा असावा, शेती हे उत्पन्नाचे मुख्य साधन असावे, शेतकऱ्याकडे ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे. फक्त एका कुटुंबातील एकाच सदस्यास या योजनेचा लाभ घेता येईल, आधार प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, दौऱ्यास निघण्याच्या दिवशी शेतकऱ्याचे वय किमान २५ वर्षे पूर्ण असावे आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असावा. यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य आहे, अर्जदाराकडे वैध पासपोर्ट असावा व त्याची मुदत किमान तीन महिने शिल्लक असावी. अर्जदार कोणत्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी किंवा खाजगी संस्थेत नोकरीस नसावा, तसेच डॉक्टर, वकील, अभियंता, सीए, कंत्राटदार इत्यादी व्यवसायाशी संबंधित नसावा, यापूर्वी शासकीय खर्चावर परदेश दौरा केलेला नसावा.

**आर्थिक सहाय्य**

शासनामार्फत एकूण दौऱ्याच्या खर्चाच्या ५० टक्के रक्कम किंवा कमाल १ लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य (अनुदान) दिले जाणार आहे. उर्वरित खर्च शेतकऱ्याने स्वतः भरावा लागेल.

**अर्ज प्रक्रिया**

इच्छुक शेतकऱ्यांनी प्रपत्र-१ मध्ये आवश्यक माहिती भरून, आवश्यक कागदपत्रांसह तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावा. जर पात्र अर्जांची संख्या लक्षांकापेक्षा अधिक झाली, तर जिल्हास्तरीय समितीमार्फत सोडत पद्धतीने निवड केली जाईल. निवड झालेल्या शेतकऱ्यांनी वैद्यकीय तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र आणि कोरोना तपासणी अहवाल अनिवार्यपणे सादर करावे.

# नारायणराव नागरे महाविद्यालयामध्ये राबविला इंडक्शन प्रोग्राम




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : स्थानिक दुसरबीड नारायणराव नागरी महाविद्यालयामध्ये २१ , २२ आणि २३ तीन दिवसांमध्ये इंडक्शन प्रोग्राम(प्रेरणा उपक्रम) आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमामध्ये प्रथम वर्षाला प्रवेशित विद्यार्थ्यांना संस्थेविषयी , महाविद्यालयातील शिस्त तसेच त्यांच्यातील सुप्त गुण शोधण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता ज्या विद्यार्थ्यांना संगीतामध्ये ,खेळामध्ये संशोधनामध्ये साहित्य कला नाट्य या विषयी त्यांच्यातील आवडीनिवडी शोधण्याच्या दृष्टीने प्रेरणा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच नव प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील वातावरणाशी जोडून घेण्याच्या दृष्टीने सुद्धा हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये झालेले बदल राष्ट्रीय शिक्षणिक धोरण २०२० (एनईपी २०२०) चा संदर्भ देत, जे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने एक व्यापक चौकट आहे. हे धोरण १९८६ च्या मागील राष्ट्रीय शिक्षणिक धोरणाची जागा घेते. एनईपी २०२० मध्ये २१ व्या शतकाच्या गरजांशी शिक्षण जुळवण्यासाठी समग्र शिक्षण, डिजिटल एकात्मता आणि व्यावसायिक प्रशिक्षण यासारख्या प्रमुख पैलूंवर लक्ष केंद्रित केले आहे. वातावरणाशी जुळवून घेण्यास आणि सहकाऱ्यांशी किंवा समवयस्कांशी संबंध निर्माण करण्यास मदत करते. असे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय नागरे अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनामार्गदर्शन केले प्रा. डॉ. दिपक देशमाने यांनी आपल्या प्रास्ताविकेत सांगितले. या कार्यक्रमासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. गणेश घुगे व प्रा. मिलिंद गवई हे उपस्थित होते यांनी सुद्धा आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विद्यार्थीनी कु. ईश्वरी बरांडे हीने केले . तसेच या कार्यक्रमासाठी प्रा. भगवान शिंदे प्रा. सुधाकर तारे प्रा. देवानंद नागरे प्रा. शेख युनुस प्रा. नयना गवारे प्रा. शंकर मेहेर प्रा. सत्यम श्रीवास्तव श्री. अनिल रणमळे तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होत्या .

### नाशिक हादरलं! 'आई, तुला त्रास द्यायचा नाहीये...', भावनिक चिठ्ठी लिहून पोलिसाच्या मुलीनं संपवलं जीवन

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक शहरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका २० वर्षीय विद्यार्थिनीने आपल्या आयुष्याचा भयावह शेवट केला आहे. तिने पोलीस खात्यात काम करणाऱ्या आपल्या आईला उद्देशून भावनिक चिठ्ठी लिहून टोकाचं पाऊल उचललं आहे. एका पोलिसाच्या मुलीनं अशाप्रकारे आत्महत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.पूजा दीप डांबरे असं आत्महत्या करणाऱ्या २० वर्षीय विद्यार्थिनीचं नाव आहे.

### अल्पवयीन नर्सिंग शिक्षण घेणाऱ्या मुलीवर अत्याचार; मालेगावात नारीशक्ती ने काढला मोर्चा




दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मालेगाव येथील खाजगी रुग्णालयात मोहम्मद अथर खुर्शीद अहमद याने नर्सिंगचे शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन हिंदू आदिवासी मुलीवर केलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ आज मालेगावात नारीशक्ती मोर्चा काढण्यात आला. गांधी पुतळ्यापासून निघालेल्या या मोर्चाची सांगता अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आली. यावेळी मोर्चातील सहभागी महिलांनी शंखनाद करत अत्याचार करणाऱ्याला फाशी द्या, ही केस फास्टट्रॅक कोर्टात चालवावी, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी उपाययोजना कराव्या अशी मागणी केली तशा आशयाचे निवेदन यावेळी अपर जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. मोर्चावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# महायुती सरकारच्या मंत्र्यांच्या प्रतिमेला चुना लावून निषेध करत शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** महायुती सरकारमधील मंत्र्यांच्या कथित गैरकारभाराविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. जळगाव ग्रामीणचे शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रा. भाऊसाहेब सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली अजित पवार गटाचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, शिंदे गटाचे गृह राज्यमंत्री योगेश कदम, आणि भाजप नेते प्रफुल्ल लोढा यांच्या प्रतिमेला चुना लावून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी आंदोलकांनी तिन्ही मंत्र्यांनी तात्काळ



राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

महायुती सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, ''महाराष्ट्रात दररोज आठ शेतकरी सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आत्महत्या करत आहेत, आणि दुसरीकडे राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे विधानभवनात ऑनलाईन जंगली रमी खेळण्यात मग्न आहेत. याचा अर्थ त्यांना शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, हमीभाव आणि भावनिक फरक यांसारख्या गंभीर समस्यांचा विसर पडला आहे.''



गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्यावरही सोनवणे यांनी गंभीर आरोप केले. ''एकीकडे राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे अपेक्षित असताना, गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावाने डान्सबार चालवत आहेत,'' असा दावा त्यांनी केला. तसेच, मंत्री महाजन यांचे भाजपाचे नेते प्रफुल्ल लोढा हे हनी ट्रॅप प्रकरणात पॉक्सो कायद्यांतर्गत अटक झाले असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

# लोकप्रतिनिधींनी सर्वोच्च सभागृहाचे पावित्र्य सांभाळावे-शेतकरी नेते रविकांत तूपकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** विधानसभेचे किंवा विधान परिषदेचे सभागृह सर्वोच्च आहे.त्याचे पावित्र्य सांभाळल्या गेले पाहिजे. ती जागा ऐतिहासिक म्हणून घोषित केली पाहिजे.त्यातून काय आदर्श घ्यायचा. कायद्याचा धाक राहिला नाही का. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेच्या अध्यक्षांनी सभापती यांनी कडक भूमिका घेतली. तर पुन्हा आयुष्यात कोणाची अशी करायची हिंमत होणार नाही.निवडून आलेला लोकप्रतिनिधी असेल किंवा सामाजिक जीवनामध्ये काम करणारा व्यक्ती असेल त्यांनी प्रत्येक बाबतीत जबाबदारीने वागले पाहिजे.तर, चुकीच्या पद्धतीने वर्तन करत असतील तर समाजातील तरुण मंडळींनी शाळकरी मुलांनी काय आदर्श घ्यावा, असे मत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी व्यक्त केले.ते पत्रकारांशी वार्तालाप करताना बोलत होते.

यावेळी ते म्हणाले की, ह्युमनी अळीच्या प्रादुर्भावामुळे शेतकरी अत्यंत संकटात सापडला आहे. एक तर पाऊस न आल्याने दुबार पेरणी झाली.ह्युमनी अळीच्या प्रादुर्भाव झाला त्याचे तात्काळ पंचनामे करून मदत झाली पाहिजे.नाहीतर पंचनामे झाले पाठवून दिले मदत दोन वर्षांनी मिळणार नाही त्याचा काय फायदा.रात्र गेली निघून आणि सोंग आले मागून माणसे मेल्यावर मदत करण्यापेक्षा आता मदतीची गरज आहे.फक्त पंचनामाचे थोतांड नको तर आम्हाला तात्काळ मदत द्यावी,अशी मागणी यावेळी त्यांनी केली.तर, सामना मुलखात उद्धव ठाकरे महाराष्ट्राच्या हितासाठी पुन्हा राज ठाकरे यांच्या सोबत चर्चा करतील. एका घरातील दोन भाऊ विभक्त असतील तर, ते पुन्हा एकत्र येतात तर तेव्हा सगळ्यांना आनंद होतो. त्यांचे एकत्र येणे मुंबईतील सर्वसामान्य माणूस म्हणतोच. पण ते फक्त मराठीच्या मुद्द्यासाठी एकत्र आलेले आहेत.

राजकीय दृष्ट्या एकत्र राहतील की नाही हे येणारा काळच सांगेल. संजय राऊत चार मंत्री घरी जातील असे म्हणत आहेत. ज्या मंत्र्यांचे रिपोर्ट खराब आहेत.. किंवा सातत्याने वादग्रस्त आहेत.. त्याच्यामुळे सरकार अडचणीत येते. अशा मंत्र्यांना बाजुला राबवण्याची मोहीम राबवली जाऊ शकते. संजय राऊत साहेबांना त्यातली माहिती असेल कारण ते सातत्याने दिल्लीत राहतात. पण ते झाले पाहिजे.कारण आपण जबाबदार पदावर बसलो. तुम्हाला सोयराचार करण्याचे स्वातंत्र्य नाही. तुमचा प्रवास सामान्याकडून असामान्यतेकडे झालेला आहे.हनीट्रॅप प्रकरण, प्रफुल्ल लोढावर गुन्हा दाखल झाला आहे.सरकारमधील जबाबदार अधिकारी असतील मंत्री असतील यांनी खूप जबाबदारीने वागणं आवश्यक आहे. तिकडे सुंदरी आली की हे जाळ्यात अडकला तयारच असतात. हे रिकामी काम करायला यांच्याकडे वेळ कुठून येतो. त्यामुळे महाराष्ट्राची आणि सरकारची प्रतिमा मलिन होत आहे. या बारा भानगडी मध्ये अधिकारी असतील लोक असतील तातडीने पदावरून हटवलं पाहिजे.



विधानसभेचे विधान परिषदेचे सभागृह हे सर्वोच्च सभागृह आहे. हे लोकशाहीचे पवित्र मंदिर आहे.या सभागृहामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न सर्वसामान्याचे प्रश्न मांडला गेले पाहिजे.तिथे त्याची चर्चा झाली पाहिजे.किंबहुना सर्वसामान्यांना न्याय देण्याची भूमिका इथं घेतल्या गेली पाहिजे.सभागृहात मिनिट टू मिनिट कामकाजाची नोंद घेतल्या जाते.त्याचे रेकॉर्ड आयुष्यभरासाठी असत.त्यामुळे सेकंड आणि सेकंड लोकांच्या कामासाठी वापरल्या गेला पाहिजे.कृषिमंत्री पद पहिला टॉप फाइव्ह मध्ये येणार आहे.ते म्हणतात मी खेळलो नाही ..मग तिथं मोबाईल हाताळण्याची गरज काय.. तिथं कामकाजामध्ये लक्ष देणे. टिपण काढणे. कृषिमंत्री महोदयांनी गंभीर झालं पाहिजे.. शेतकरी आज अडचणीत आहे..ह्युमनी अळीने सोयाबीन फस्त झालेली आहे.युरिया मिळत नाही.दुबार पेरणीचे संकट उभ राहिले.सीड कंपनीचे बियाणे उगवले नाही. त्यामुळे शेतकरी फसले गेले आहेत.पीक कर्ज मिळायला तयार नाही.सगळ्या बाजुने शेतकरी अडचणीत सापडलेला असताना.

गाव गावी जाऊन दौरे करायची शेतकऱ्यांना दिलासा देण्याची असताना.. त्यांची ही पहिली वेळ नाही. सातत्याने शेतकऱ्यांना अपमानित करणे. त्यांना भिकारी म्हणणे. एक रुपया सुद्धा भिकारी घेत नाही.म्हणजे आम्ही खालच्या पातळीचे आहोत. असं अपमानित वक्तव्य करणे.वारंवार शेतकऱ्यांना अपमानित करण्याचे काम त्यांनी केलेले आहे.त्यामुळे कृषिमंत्र्याच्या राजीनामाची सरकारने विचार केला पाहिजे.. अशी आमची मागणी आहे. सत्ताधारी नेत्यांनी खूप संयम ठेवणे आवश्यक आहे. आपण सत्य पाहू तर लोक आपल्याला प्रश्न विचारणार आहे. त्यांना उत्तर देणे आपली बांधिलकी आहे.चिडून जाऊन चळवळीतील कार्यकर्त्याला मारहाण करणे दुर्दैवी आहे.

चळवळी करायच्या नाही का प्रश्न विचारायचे नाही का.आंदोलने करायची नाहीत का.मग प्रश्न आम्ही कुणाला विचारायचे.आता कुंपणच शेत खात असेल तर न्याय मागायचा कुणाकडे.असा प्रश्न उपस्थित होत आहे. लातूरमध्ये विजयकुमार घाडगे ला झालेली मारहाण दुर्दैवी आहे. त्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. त्यामुळे सत्तेतील कोणतेही नेत्यांनी किंबहुना सत्ताधारी पक्षातील कार्यकर्त्यांनी संयम ठेवावा, असे मतही यावेळी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

## शेतकरी कर्जमाफी व ईतर मागण्यांसाठी येत्या २४ तारखेला दिग्रस सह अनेक ठिकाणी चक्का जाम आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**दिग्रस :** प्रहार पक्षाचे तालुकाप्रमुख धीरज आडे सह अनेक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस स्टेशन दिग्रस येथे निवेदनाद्वारे येत्या २४ तारखेला दिग्रस शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे चक्काजाम आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात सांगितले आहे. या आंदोलनामध्ये सर्व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे प्रहार चे तालुकाप्रमुख धीरज आडे यांनी सांगितले. या आंदोलनामध्ये सर्वपक्षीय संघटना शेतकरी, दिव्यांग, शेतमजूर, मेंढपाळ, मच्छीमार, कामगार आदींचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणार आहे. शेतकरी कृषी प्रधान देश असून देशाच्या नकाशा त यवतमाळ जिल्ह्यात हा आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून सर्वत्र ओळखला जातो. कर्जापाई अनेक शेतकऱ्यांनी आपली जीवन यात्रा संपवली आहे. याकरिता सर्व घटकातील लोकांनी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन देखील त्यावेळेस करण्यात आले.

या आंदोलनाची उद्दिष्ट, शेतकरी कर्जमाफी तत्काळ जाहीर करणे, सातबारा कोरा आदेशाची अंमलबजावणी करणे, इतर प्रलंबित मागण्या तत्काळ मंजूर कराव्यात. त्याच अनुषंगाने पोलीस प्रशासनाला सूचित करण्यात आले की सुरक्षेची काळजी: रुग्णवाहिका,अग्निशामक, आपत्कालीन वाहने यांना कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची कडक दक्षता घेतली जाईल. कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचू नये म्हणून स्वयंसेवक तैनाथ असतील ध्वनी प्रदूषण व सार्वजनिक संपत्तीचे नुकसान होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घेतली जाणार आहे.

पोलिसांना विनंती करण्यात आली आहे की कृपया या मार्गावर पोलीस सुरक्षा बंदोबस्त ठेवून या शांततापूर्ण लोकशाही मार्गाने होणाऱ्या आंदोलनास आवश्यक ते सहकार्य करावे. असे निवेदनाच्या मार्फत मागणी करण्यात आली आहे. यावेळी प्रहार पक्षाचे तालुकाप्रमुख धीरज आडे, मनोज बळीराम राठोड, रवींद्र अरगडे, भारत पाटील, अजिंक्य मात्रे, अरबाज धारीवाला, राहुल देशपांडे, वयाच प्रमाणे अनेक पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते

## छत्रपती संभाजीनगर ते मुंबई महामार्गावर जीवघेणा खड्डा

**प्रशासनाचे दुर्लक्ष : खड्ड्यांमुळे दरदिवशी अपघात**



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर ते मुंबई महामार्गावर जीवघेणा खड्डा पडल्यामुळे वाहनधारकांचे अपघात घडत आहेत. सदर खड्ड्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने वाहनधारकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.याकडे संबंधीत विभागाने लक्ष देऊन सदर खड्डा तात्काळ बुजवावा, अशी मागणी वाहनधारकांकडून होत आहे.

छत्रपती संभाजीनगर महामार्गावर डोणगाव जवळ भलामोठा खड्डा पडल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सदर मार्ग हा महामार्ग असल्याने या माऱ्गावरील वाहने हे भरधाव वेगाने असतात. भरधाव असणाऱ्या वाहनचालकांला सदर खड्डा जवळ येईपर्यंत दिसत नसल्याने या खड्ड्यात वाहन आदळून मोठे अपघात घडत आहेत. तसेच दुचाकीधारकांचे सुद्धा या खड्ड्यामुळे अनेक अपघात घडले आहेत. खड्ड्यांमुळे वाढलेले अपघात कमी करण्यासाठी सदर खड्डा तात्काळ बुजवावा,अशी मागणी होत आहे.

काही सुज्ञ नागरिकांना सदर खड्ड्यामुळे अपघात होऊ नये,यासाठी खड्ड्यामध्ये लाकूड रोवून वाहनधारकांना सतर्क केले जात आहे. छत्रपती संभाजीनगर ते मुंबई महामार्गावर असल्याने या मार्गावरून रुग्ण तसेच अधिकारी, पदाधिकारी तसेच इतर नागरिकांना छत्रपती संभाजीनगर, मुंबई, जालना आदी ठिकाणी जावे लागते. रात्रीच्या वेळेस सदर वाहनधारकांना जावे लागते.भरधाव वाहनचालकांना सदर खड्डा जवळ येईपर्यंत दिसत नसल्याने या खड्ड्यात वाहन आदळून अपघात घडत आहेत.

दुचाकीधारकांचे या खड्ड्यामुळे अनेक अपघात घडले आहेत. तसेच दरदिवशी दुचाकीधारक व कार यासह इतर वाहनांचे अपघात घडत आहेत. प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष असल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी संबंधीत विभागाने याकडे लक्ष देऊन या मार्गावरील हा जीवघेणा खड्डा तात्काळ बुजवावा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे.

## जिल्ह्यातील ३० लाख ९ हजार रुपयाचे १७७ गहाळ झालेले मोबाईल मूळ मालकांना पोलिसांनी केले परत

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बुलडाणा :** बुलढाणा जिल्ह्यात मोबाईल गहाळ झाल्याच्या अनेक तक्रारी जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी विशेष पथकाची नेमणूक करत, पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे गुन्ह्याचा उलघडा करून, विविध ठिकाणाहून पोलिसांनी ३० लाख ९ हजार रुपये किमतीचे १७७ मोबाईल हस्तगत केले आहेत. यातील अनेक मोबाईल चोरी करून इतरांना विक्री करण्यात आले होते. हे सर्व मोबाईल बुलढाणा पोलिसांनी मूळ मालकांना आज अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या हस्ते परत केले आहेत. तर यावेळी अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या हस्ते महाराष्ट्र पोलीस कल्याण योजना पुस्तिकेचे पोलीस कुटुंबीयांना वितरण करण्यात आले आहे.

## विविध वृत्त...

### अघोरीकृत्य करण्याच्या प्रयत्नात असलेल्या पाच आरोपीना अटक




दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** यवतमाळ तालुक्यातील साकुर येथे काही व्यक्ती अघोरीकृत्य करण्याचा प्रयत्नात होते. मात्र यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी छापा टाकला. तेव्हा घरातील एका खोलीत मोठा खड्डा खोदून ठेवण्यात आला होता. खड्ड्याच्या बाजूलाच लिंबू, नारळ,ओटीचे सामान आढळून आले. घटनास्थळावरून पाच आरोपीला अटक करण्यात आली. तर एक आरोपी पसार झाला. आकाश कोटनाके, कुणाल खेकारे, वृषभ तोडसकर, प्रदिप इळपाते, बबलू येरेकर असे ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या बद्दल केलेल्या आक्षेपार्ह विधाना विरोधात धनगर बांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालयात धडक



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या संदर्भात फेसबुक वर आक्षेपार्ह अश्लील व घाणेरडी पोस्ट करणाऱ्या पुणे येथील सुनील गोपाळ उभे यांचा निषेध करण्यासाठी आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर सकल धनगर समाजाकडून एकजूट होऊन निर्दशने करण्यात आली. अहिल्यादेवी होळकर यांच्या बाबत उभे यांनी वापरली ती भाषा या महाराष्ट्राची, मराठी समाजाची संस्कृती असू शकत नाही, हे महाराष्ट्रातील वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न होत आहे. त्याला आमचे तथाकथित नेते, राज्यस्तरावरील पदाधिकारी सत्तेच्या दालनात राज्यपालासारखे जे लोक आहेत. त्यांनी आमच्या महापुरुषाबद्दल अशीच भाषा वापरली, शिवाजी महाराज, सावित्री फुले यांच्याबाबत सुद्धा आक्षेप वक्तव्य केले होते. त्याचाच आदर्श घेऊन ही पिलावळ अशाप्रकारे आदर्शांना हीन लेखात, अहिल्यादेवी होळकर यांच्याबाबत पहिल्यांदाच अशा प्रकारची टिपणी केली आहे. त्यामुळे या सुनील उभे याच्या वर अमरावती मध्ये सुद्धा गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी यावेळी धनगर समाज बांधवांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन केली. यावेळी मोठ्या प्रमाणात जिल्ह्यातील धनगर समाज बांधव उपस्थित होते.

### अमरावतीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात मध्ये कृषीमंत्र्यांच्या विरोधात प्रहार संघटना आक्रमक




**अमरावती/प्रतिनिधी :** राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानभवनात ऑनलाईन रमी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर चांगलाच गदारोळ सुरू आहे. अमरावतीमध्ये सुद्धा या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. या प्रहार संघटनेचे महानगर प्रमुख बंटी रामटेके यांच्या नेतृत्वात अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात पत्ते फेकून आंदोलन करण्यात आले. कृषी मंत्री यांचा निषेध करण्यात आला, यावेळी महिलांनी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या पोस्टरला जोडे चपला मारून त्यांचा निषेध व्यक्त केला. विधानभवनातून शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग यांच्या फायद्याचे निर्णय होतील अशी अपेक्षा असताना मंत्री मात्र पत्ते खेळण्यात आणी मारामाऱ्या करण्यात व्यस्त आहेत. अशा मंत्र्यांना बडतर्फ करण्याची मागणी यावेळी आंदोलकांतर्फे करण्यात आली. पोलिसांनी वेळीच धाव घेऊन पत्ते बॅनर जप्त केले.